तरुण भारत
Apla Nagpur | 2022-02-03 | Page- 6
epaper.tarunbharat.net

# खैरी बुटी गावात आज रुग्णवाहिका प्रदान सोहळा

**नागपूर** : पुणे येथील क्विक हिल फाऊंडेशनने जनकल्याणकारी समितीला एक रुग्णवाहिका भेट दिली असून, तिचा लोकार्पण समारोह गुरुवार, ३ फेब्रुवारीला उमरेड तालुक्यातील खैरी बुटी गावात दुपारी ३.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास क्विक हिल फाऊंडेशनच्या अध्यक्ष अनुपमा काटकर प्रमुख अतिथी राहतील. याप्रसंगी उपस्थित राहण्याचे आवाहन जनकल्याणकारी समितीचे अध्यक्ष सुमंत पुणतांबेकर, उपाध्यक्ष रवींद्र जोशी, दिलीप चांद्रायण, सचिव दीपक देशपांडे व कार्यकारी मंडळाने केले आहे. जनकल्याणकारी समितीतर्फे उमरेड तालुक्यातील मुरादपूर, भिवगड व उमरेड या ग्रामसंकुलात व हिंगणा तालुक्यातील २६ गावांमध्ये सर्वांगीण ग्रामविकासाचे कार्य चालते. या रुग्णवाहिकेच्या माध्यमातून जवळपास आठ हजार नागरिकांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचणार आहे. खापरीच्या स्वामी विवेकानंद मेडिकल मिशनचे वैद्यकीय अधिकारी व परिचारिकांची सेवा येथे उपलब्ध होणार असून, २५ आरोग्यसेविका सध्या येथे कार्यरत आहेत. दुर्गम आदिवासी लोकांना त्याचा लाभ मिळणार आहे.